# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/02/2024 (सोमवार) सकाळ


---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. रामटेक:— अंतर्गत मौजा घोटीटोक गावाजवळ दिनांक १९/०२/२०२४ चे ००.१० वा. ते ०१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— रमेश परसराम लांडगे, वय ४४ वर्ष रा. मोहाडी जि. भंडारा याचा जावई नामे— राजु कुथे हे चालवित असलेले ट्रक क्र. एम.एच—३२/क्यु—१०९२ मध्ये डोंगरी बुज्रुक येथुन मॅग्नीज लोड करून तुमसर ते रामटेक रोडने जात असता रामटेक रोडवर घोटीटोक चौकाजवळ रामटेक कडुन तुमसरकडे गिट्टी लोड करून जाणाऱ्या टिप्पर क्र. एम. एच—४०/बी.एफ— ३४३४ चे चालक **आरोपी व मृतक नामे— रूपेश राजकुमार धुर्वे, वय २२ वर्ष, रा. करकोटी ता. कुरई जि. सिवनी** याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन आमोरासमोरून जोरदार धडक देवुन अपघात केला. सदर अपघातामध्ये फिर्यादीचे जावई यांचे मरणास तसेच स्वत:चे मरणास आरोपी हा कारणीभूत ठरला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे रामटेक येथे आरोपीविरूद्ध कलम २७९, ३०४(अ), १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## डीझेल चोरी करणारा आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०४ किमी अंतरावर एन. एच ४४ हायवे नागपुर जबलपुर रोड, हॉटेल हॉलीडे इन जवळ कन्हान येथे दिनांक १८/०२/२०२४ चे ०३.०० वा. ते ०६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— विकास पारसनात पांडे, वय ४७ वर्ष रा. मेहंदी बाग रोड, जय भोले नगर, नागपुर हा आपल्या १८ चक्का गाडी ट्रक क्रं. एम.एच—४९/बी झेड— ११३९ मध्ये फिर्यादी व फिर्यादी सोबत क्लिनर श्रीराम ट्रान्सपोर्ट चंद्रपुरने मध्यप्रदेशला कोळसा भरून जात असता फिर्यादीच्या ट्रक मध्ये ३१५ लिटर डिझेल भरून नागपुर जबलपुर हायवेने जात असता अंदाजे दिनांक १८/०२/२०२४ चे पहाटे ०३/०० वा. दरम्यान फिर्यादीला झोप लागत असल्याने फिर्यादीने आपली १८ चक्का गाडी ट्रक क्रं. एम.एच—४९/बी झेड— ११३९ हे नागपुर जबलपुर रोड वरील हॉटेल हॉलीडे समोर लावुन फिर्यादी व गाडीचा क्लिनर सोबत गाडीमध्येच झोपला असता सकाळी ०६/३० वा. उठुन पाहीले असता गाडीचे डिझल टंकीचे झाकन तुटलेले दिसले व सेन्सर पण पुर्ण तुटलेले होते. फिर्यादीने डिझल टंकी मध्ये टॉर्च लावुन पाहीले असता गाडीत फक्त १० लिटर डिझल होते. अंदाजे २०० लिटर डिझेल किंमती २०,०००/— रू. **आरोपी नामे— मोहम्मद सलीम उल्लाह अंसारी वय २७ वर्ष, रा. खंडाळा ता. पारशिवनी जि. नागपुर** डीझेल चोरी करतांना मिळुन आला व सेन्सर किट ज्याची किंमत अंदाजे ८०,०००/— रू. नुकसान केले. फिर्यादीने आरोपीस पकडुन कन्हान पोलीसांच्या ताब्यात दिले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे **आरोपी नामे— मोहम्मद सलीम उल्लाह अंसारी वय २७ वर्ष, रा. खंडाळा ता. पारशिवनी जि. नागपुर** यांचेविरूद्ध कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद

केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सचिन वेळेकर, मो. नं. ८८३००९५३१३ हे करीत आहे.

ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील सपोनि चव्हान, पोहवा हरीश सोनभद्रे, सचिन वेळेकर, नापोशि अमोल नागरे, सफौ सुर्यभान जळते यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर